DAY — 01

2014	II	20	1100	J - 501	(M)

MARATHI (02)

Time : 3 Hrs. (6 Pages) Max. Marks : 80

प्र. १. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर सुमारे ३०० शब्दांत निबंध लिहा : [१०]

(१) विज्ञानयुगातील अंधश्रद्धा

(२) नववर्षाच्या स्वागताचा जल्लोष

(३) शेतकऱ्याचे मनोगत

(४) माणूस बोलणे विसरला तर .....

प्र. २. (अ) खालील काव्यवेच्याचे रसग्रहण करा : (६) [१०]

'कणा'

'ओळखलंत का सर मला' - पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले केसांवरती पाणी
क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून :
'गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहून;
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतींत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी - बायको मात्र वाचली -
भिंत खचली चूल विझली होते-नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले -

कारभारणीला घेऊन संगे सर, आता लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे, चिखल-गाळ काढतो आहे' -
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला,
'पैसे नको सर, जरा एकटेपणा वाटला -
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा.'

— **कवी कुसुमाग्रज**

किंवा

(अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयाशी निगडित सुमारे १५ ते २० ओळींत संवादलेखन करा :

(१) वाहतूक व्यवस्था कोलमडल्याने होणाऱ्या त्रासाबद्दल त्रस्त नागरिक व वाहतूक नियंत्रक अधिकारी यांच्यातील संवाद.

(२) वाढत्या महागाईबद्दल दोन गृहिणींमधील संवाद.

(३) इयत्ता बारावीच्या अभ्यासाच्या नियोजनासंबंधी विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद.

(ब) खालील प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा : (४)

(१) खालील नामासाठी योग्य विशेषण निवडा :

आकाश -

(अ) गोड (ब) हिरवे (क) उसळलेले (ड) ढगाळलेले

(२) खालील शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा :

मनमुराद -

(अ) मनसोक्त (ब) मनोरथ (क) मनोकामना (ड) मनोहर

(३) गटात न बसणारा शब्द ओळखा :

(१) लटलट -

(अ) कटकट (ब) वटवट (क) सटासट (ड) झटझट

(२) सुंदर-बिंदर -

(अ) जातं-बितं (ब) पुण्य-बिण्य (क) जेवण-बिवण

(ड) माणूस-काणूस

प्र. ३. खालील प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा : [१२]

(अ) खालील पर्यायांतून निर्दोष शब्द ओळखा : (२)

(१) (य) उल्लेखनीय (र) ऊल्लेखनीय (ल) उल्लेखनिय (व) उलेखनीय

(२) (य) रुगणालय (र) रुग्नालय (ल) रुग्णालय (व) रूग्णालय

(ब) खालील वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा : (२)

(१) दातखिळी बसणे -

(य) दातदुखी होणे (र) बोलती बंद होणे

(ल) दात पडणे (व) दात घासणे

(२) मनोरथ पूर्ण होणे -

(य) इच्छा पूर्ण होणे (र) मनाविरुद्ध घडणे

(ल) मनाला लहर येणे (व) मन दु:खी होणे

(क) (१) खालील वाक्याचे प्रश्नार्थी रूपांतर ओळखा : (१)

वाक्य : मी त्यांना माझ्या ह्दयाच्या कप्प्यात जपून ठेवलंय.

(य) मी त्यांना माझ्या ह्दयाच्या कप्प्यात जपून ठेवलंय ना!

(र) मी त्यांना माझ्या ह्दयाच्या कप्प्यात जपून ठेवलंय का?

(ल) मी त्यांना माझ्या ह्दयाच्या कप्प्यात जपून ठेवायला पाहिजे.

(२) खालील वाक्याचे नकारार्थी रूपांतर ओळखा : (१)

वाक्य : बालक हा पहिला शास्त्रज्ञ असतो ना!

(य) बालक हा पहिला शास्त्रज्ञ असतो.

(र) बालक हा पहिला शास्त्रज्ञ असतो का?

(ल) बालक हा पहिला शास्त्रज्ञ नसतो असे नाही.

(ड) खालील वाक्यांत कोणती विरामचिन्हे वापरता येतील, तो पर्याय निवडा : (२)

(१) वाक्य : हूनहून काय हुईल काय आसं

(य) उद्‌गारवाचकचिन्ह, दुहेरी अवतरणचिन्ह

(र) पूर्णविराम, दुहेरी अवतरणचिन्ह

(ल) प्रश्नचिन्ह, एकेरी अवतरणचिन्ह

(व) दुहेरी अवतरणचिन्ह, प्रश्नचिन्ह

(२) **वाक्य :** सोयी गैरसोयीही बऱ्याच होत्या तरीसुद्धा ..... इट वॉज माय स्वीट ..... स्वीट होम

(य) प्रश्नचिन्ह, पूर्णविराम

(र) प्रश्नचिन्ह, उद्‌गारवाचकचिन्ह

(ल) स्वल्पविराम, उद्‌गारवाचकचिन्ह

(व) स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह

(इ) खालील विधानांत/काव्यपंक्तींत कोणता रस प्रामुख्याने आढळतो, त्यासाठी योग्य पर्याय निवडा : (२)

(१) ''आपल्या हॉर्नचा आवाज १३५ डेसिबल आहे – त्यामुळे मानवी कानांना इजा होईल. ध्वनिप्रदूषणामुळे रक्तदाब वाढतो, श्रवणशक्तीवर परिणाम होतो.'' असं म्हणत यंत्रमानवानं ध्वनिप्रदूषणाचे आणखी चार तोटे सुनावले.

(य) शृंगार (र) हास्य (ल) बीभत्स (व) वीर

(२) 'रांधा, वाढा, उष्टी काढा' कपाळावर गोंदण
राबण्याचा गाव तिला लग्नात मिळाला आंदण!

(य) करुण (र) शृंगार (ल) रौद्र (व) शांत

(इ) खालील पारिभाषिक शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा : (२)

(१) Motto : (य) स्मरणचिन्ह (र) ब्रीदवाक्य (ल) संकलन (व) गौरव

(२) Zone : (य) विभाग–परिमंडळ (र) उत्साह–जोम (ल) सीमा (व) वर्तुळ

प्र. ४. (अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा : (४) [७]

(१) 'विनोद : एक वाङ्‌मयप्रकार' या पाठाच्या आधारे विनोदाचे फायदे कोणते, ते सांगा.

(२) गुंडगुळ्याच्या माळावरून जाताना तुकारामांच्या मनात कोणकोणते विचार येत होते?

(३) परीक्षेच्या वेळी वीज जाण्याची शक्यता असण्याच्या संदर्भात आई–वडिलांनी मानसीकडून कोणकोणते सराव करून घेतले?

(ब) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (३)

(१) विनोदाचे सामान्यपणे कोणते प्रकार मानले जातात?

(२) 'भुताचा जन्म' या विनोदी कथेचा नायक कोण आहे?

(३) रश्मी किती तास भजी तळत होती?

(४) धत्तुऱ्याने लल्लाटी काय लावले?

(५) आई-वडिलांनी कोणत्या आवाजाची टेप मागे लावून मानसीला पेपर लिहायला लावला?

प्र. ५. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : (८) [१२]

(१) फ्रामरोझचे आयुष्य कसे सार्थकी लागले, ते सांगा.

(२) डॉ. अब्दुल कलाम यांनी मुलांना स्वप्ने पाहण्याचा सल्ला का दिला?

(३) ले. कर्नल श्याम चव्हाण यांना कुटुंबीयांची आठवण केव्हा व का आली?

(४) यंत्रमानवाच्या आहारी जाण्याचे दुष्परिणाम निरंजन घाटे यांनी कसे वर्णिले आहेत?

(ब) खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (४)

(१) रवींद्र पिंगे यांना 'नंदनवन' वाटणाऱ्या गावाचे नाव काय?

(२) भारत-चीन युद्धाच्या वेळी कोणत्या गाण्याने अख्खा देश हालवून सोडला होता?

(३) गिरिजा कीर यांच्यातील काव्यात्म वृत्ती कोणी जागविली?

(४) मनगटावरच्या घड्याळासाठी कोणी प्राण गमावले?

(५) बाबुरावांचा 'भारत यंत्रमानव निर्माण कंपनी'शी कोणता संबंध होता?

(६) उन्नीकृष्णन यांच्या पत्नीने कोणाला आपली मुले बनविले होते?

प्र. ६. (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : [११] (८)

(१) संत जनाबाईंच्या रचनेतील रूपकात्मकता स्पष्ट करा.

(२) महात्मा जोतीराव फुले यांनी 'अखंड'मधून कोणता विचार मांडला आहे?

(३) शांता शेळके यांनी स्त्रीजीवनाचे चित्रण कसे केले आहे?

(४) नारायण सुर्वे यांना भारलेले हात केव्हा व कशासाठी हवे आहेत?

(ब) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (३)

(१) द्रव्य कशासम मानावे?

(२) 'या जन्माला फुटे न भाषा' या कवितेचे कवी कोण?

(३) साधुपुरुषाचे अंतर कशाने वोसंडत असते?

(४) पहाटेच्या प्रहराला कशाचे स्वप्न जळते?

(५) आपल्या छोट्या नव्या नगराची मानसिकता कशी असेल?

प्र. ७. (अ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : (८)[१८]

(१) अग्रलेख आणि बातमी यांमधील फरक स्पष्ट करा.

(२) भारतात आकाशवाणी केंद्राची निर्मिती कशी झाली?

(३) दूरचित्रवाणीवरील बातम्यांसाठी कोणती यंत्रणा असते? ती कशा तऱ्हेने काम करते?

(४) 'एचटीएमएल'चे महत्त्व सांगा.

(ब) खालीलपैकी कोणत्याही <u>सहा</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (६)

(१) बाळशास्त्री जांभेकर यांच्या वर्तमानपत्राचे नाव सांगा.

(२) प्रतिपक्षावर तुटून पडणाऱ्या अग्रलेखाला कोणत्या प्रकारचा अग्रलेख म्हणतात?

(३) भारतीय आकाशवाणीचे 'ब्रीदवाक्य' कोणते आहे?

(४) आर. जे. म्हणजे काय?

(५) भारत सरकारला पहिला प्रक्षेपक बनवून देणाऱ्या कंपनीचे नाव सांगा.

(६) जाहिरात कलेत लक्ष्यस्थानी कोण असते?

(७) महाजालाचे संदेशवहन कोणामुळे सुरळीत राहते?

(८) आकाशवाणीचा शोध कोणी लावला?

(९) 'ब्लॉग'ला मराठीत काय म्हणतात?

(क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर मुलाखतपूर्व तयारी म्हणून प्रश्नावली तयार करा : (४)

(१) आदिवासी विभागात काम करणाऱ्या सेवाभावी कार्यकर्तीची मुलाखत.

(२) महापालिकेच्या निवडणुकीस उभ्या राहिलेल्या उमेदवाराची मुलाखत.

(३) कचरा गोळा करणाऱ्या गाडीवरच्या कामगाराची मुलाखत.

◆◆◆